# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.२२२६७५ / २२ /अ.क्र.२६५० /२६**

श्री. अरुण मुरलीधर बेळे
रुम नं.४१८, बिल्डिंग नं.०३, नया सवेरा,
म्हाडा वसाहत, वाशीनाका, चेंबूर, मुंबई-४०००७४.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता (सा.बां) मंडळ विभाग
बृहन्मुंबई महानगरपालिका आमदार निवास सा.बां. उपविभाग बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४००००१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा अधोक्षक अभियंता सा.बां मंडळ
विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका आमदार निवास सा.बां.
उपविभाग बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४००००१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०३.२०२६**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाच्या/आदेशाच्या दिनांक |
|---|---|---|---|
| ०९.०२.२०२२ | -- | २१.०३.२०२२ | १२.०४.२०२२ |

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीनी दाखल केलेल्या दिनांक ०९.०२.२०२२ रोजीच्या जोडपत्रानुसार खाऊ गल्ली, सी.एस.एम.टी. स्टेशनच्या दक्षिण बोगद्यासमोरील पूर्वीच्या झुणका भाकर केंद्राच्या जागेवर नवीन धंद्यांना दिलेल्या परवानगी विषयी एकूण तीन मुद्द्यांची माहिती मागितली असून तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित प्रतिसाद दिला नसल्याचा आक्षेप नोंदवित अपिलार्थीनी दिनांक २१.०३.२०२२ रोजी प्रथम अपील अर्ज अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे दाखल केलेला आहे. यावर दिनांक २८ मार्च, २०२२ रोजी सुनावणी सूचना निर्गमित करण्यात आली व दिनांक १२.०४.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीस अपिलार्थी तथा जन माहिती अधिकारी हजर होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसून कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांच्या कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करून देण्यात येईल असे नमूद केले आहे.

यावर तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता मुंबई, सार्वजनिक बांधकाम मंडळ मुंबई श्री.सु.गो. पवार यांनी असा निर्णय दिला की, अपिलार्थींनी दिनांक ०९.०२.२०२२ रोजीच्या अर्जावर मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग यांनी त्यांच्याकडे अपिलार्थींनी मागणी केलेल्या माहितीची खातरजमा करून त्यासंबंधीची सर्व कागदपत्रे (नकाशासहित) सदर आदेश निर्गमित झाल्यापासून दहा दिवसात मंडळ कार्यालयास उपलब्ध करून देणेबाबत कार्यकारी अभियंता, इलाखा शहर यांनी पुरविण्यात यावे असे आदेशित केले.

प्रथम अपिलिय अधिकाऱ्यांच्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याने अपिलार्थींनी दिनांक ०९.०५.२०२२ व २७.०५.२०२२ रोजी स्मरणपत्र दिले असून त्यादरम्यान दिनांक १७.०५.२०२२ रोजी कार्यकारी अभियंता, इलाखा शहर, मुंबई विभाग यांच्या कार्यालयाने दिनांक ०९.०५.२०२२ रोजीच्या पत्राला उत्तर देताना त्यांचे कार्यालयामार्फत कोणतेही गाळ्यांचे वाटप आदेश निर्गमित केले जात नाहीत व या कार्यालयास तसे अधिकार नाहीत तसेच पूर्वीच्या झुणका भाकर केंद्राच्या जागेत नवीन धंद्यांना सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयामार्फत परवानगी दिलेली नाही व त्याविषयीचा कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार, करारनामा, भाडे आकारणी या कार्यालयामार्फत करण्यात आली नसल्याचा प्रतिसाद दिला. त्याविरुद्ध अपिलार्थींनी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे.

आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी तसेच प्राधिकरणाच्या वतीने कोणीही उपस्थित नसून मागितलेल्या माहितीचा कालावधी तसेच दिनांक १७.०५.२०२२ रोजी प्रथम अपील अर्जानंतर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, इलाखा शहर यांनी दिलेल्या उत्तराचे अवलोकन केले असता प्रस्तुत अपील अर्ज निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत असून प्रस्तुत अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २३-०३-२०२६**

State Information Commission Maharashtra

Jyotsna